Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**जाहिरातीचा प्रारुप-**

| |
|---|
| **महाराष्ट्र शासन**<br><br>**(जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जि.प.सांगली)**<br><br>**स्वारस्य अभिव्यक्ति (EOI)**<br><br>**स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा २ अंतर्गत तांत्रीक सहयोगी संस्था / व्यक्ती (TSP) म्हणून काम करुन इच्छिणाऱ्या संस्थांकडून विहीत नमुन्यात सुची तयार करण्यासाठी आवेदन** |
| स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा २ अंतर्गत सांगली जिल्हयात सन २०२२-२३ मध्ये **मैला गाळ व्यवस्थापन (Faecal Sludge Management )** प्रकल्पाचे कामासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील काम करणाऱ्या तांत्रीक सहयोगी संस्था / व्यक्ती (TSP) यांच्याकडून सहयोग देण्याची इच्छा असेल त्यांच्याकडून अर्ज या कार्यालयाकडे मागविण्यात येत आहेत. याबाबतचे कामाचे प्रारुप , अटी व शर्ती www.zpsangli.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| अध्यक्ष,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद सांगली. ४१६४१६<br>दुरध्वनी क्रमांक : ०२३३/ २३७३७३४. Email id -: nbazpsangli@gmail.com |
| अर्ज स्वीकारणेची शेवटची तारीख दि. १२ / ०५/२०२२ रोजी सायंकाळी - ५.४५ पर्यंत. |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**अटी व शर्ती.**

१.सदर निविदेचे दर कार्यारंभ आदेशापासून एक वर्षापर्यंत वैध राहतील. याबाबत मधील कालावधीत शासनाकडून दरात कपात झाल्यास त्यानुसार अथवा शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार बदल होईल.

२.व्यावसायीक संस्था/ स्वयंसेवी संस्था / व्यक्ती यांनी विभाग/उपविभाग यांचे प्राधान्य क्रमानुसार प्रस्ताव सादर करावेत.

३.जागेची उपलब्धता/ परवाने यांची खात्री करुन प्रस्ताव करावेत.प्रस्ताव तांत्रिक व प्रशसकिय मंजुरी मिळेपर्यंत त्यामध्ये होणाऱ्या बदलानुसार प्रस्तावातील बदल आहे त्याच किमतीत करावा लागेल.

४.सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) ची तपासणी करुन दिलेल्या नमुन्या नुसार व बरोबर असल्याची खात्री करुन वरिष्ठ कार्यालयाच्या परवानगीने व निर्देशानुसार , एम्पॅनेलमेंट व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांनी सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणे याबाबीकरिता **जिल्हयास मैला गाळ व्यवस्थापन,** करिता प्रत्येकी अनुज्ञेय असलेल्या निधीच्या ५% किंवा रुपये १,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त) यापैकी जी कमी असेल त्या रकमेच्या मर्यादेपर्यंत (तथापि सदरची रक्कम रुपये १,००,०००/- रुपये एक लक्ष फक्त ) पेक्षा जास्त नसावी) व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांना शुल्क म्हणून शासन स्तरावरुन संबंधीत प्रकल्पासाठी निधी उपलब्ध झालेनंतरच खालील प्रमाणे अदा करण्यात येईल.

| **अ. क्र.** | **EOI संस्था कामाचे टप्पे** | **प्रत्यक्ष केलेल्या कामासाठी EOI संस्था शुल्क अदायगी टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | सर्वेक्षण, अंदाजपत्रके व आराखडे तयार करणे. | तांत्रिक व प्रशासकिय मान्यता प्रदान केल्यानंतर एकूण अनुज्ञेय व्यावसायीक / EOI संस्था शुल्काच्या १५ % रक्कम |
| २ | कामाच्या कंत्राटदाराकडून उपांगाच्या कामाचे पर्यवेक्षण करुन काम पूर्ण करुन घेणे | अनुज्ञेय व्यावसायीक / EOI संस्था शुल्काच्या ७० % रक्कम |
| ३ | कामाची समाधानकारक देखभाल व दुरुस्ती. | अनुज्ञेय व्यावसायीक / EOI संस्था शुल्काच्या १५ % रक्कम. (एकूण ५ वर्षात समान हप्त्यात विभागून) |

५. काम करित असताना केंद्र शासन व राज्य शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार काम करणे बंधनकारक आहे.

६.आदेशाच्या तारखेपासुन १५ दिवसांत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन संबंधीत उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग यांचेकडे सादर करणेचे आहेत.

७.सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस विलंब झाल्यास आपण दंडास पात्र रहाल. (दंड किती आकारावयाचा याबाबत मा.मु.का.अ.यांचे आदेश अंतिम राहतील).

८.आर्थिक वर्ष संपल्यानंतर आवश्यक असल्यास कामांना मुदतवाढ देणे किंवा कामांचे नवीन दरपत्रक DPR मागविणे ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सांगली यांच्या अधिकारात राहील.

९.वेळोवेळी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व) व कार्यकारी अभियंता (ग्रापापु) तसेच वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या लेखी व तोंडी सुचनेनुसार कार्यवाही करणेत यावी.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



१०.निवड केलेल्या संस्थेने संबंधीत ग्रामपंचायतीशी १००रु च्या स्टॅम्पवर सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) कामा बाबत करार करावा.

११.निवड केलेल्या संस्थांचे करार कोणतेही कारण न देता रदद करणेचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

१२. सदरच्या एम्पॅनेलमेंट व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांना मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प चे सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणे याबाबींचा अनुभव असणे आवश्यक आहे.

( विजयसिंह जाधव )
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व)
सांगली जिल्हा परिषद, सांगली.

(जितेंद्र डुडी)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सांगली जिल्हा परिषद, सांगली.